# डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी नागपूर : 'लिंग समानता व संवेदनशीलता' यावर आधारित  कार्यशाळेचे आयोजन` 26, 27, 28 डिसेंबर, 2019

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी नागपूर येथील अर्थशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र व पाली प्राकृत विभाग व असोसिएशन ऑफ इप्रा. नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'लिंग संवेदनशीलता व समानता' या विषयावर तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. दि. 26, डिसेंबर 2019 या तीन दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन. मा. प्रा. विमल थोरात ( निवृत्त प्राध्यापक जेनयु दिल्ली) व मा. प्रा. डॉ. शैलेंद्र लेंडे (मराठी विभाग प्रमुख त्ज्डछन) यांच्या हस्ते झाले. मा. प्रा. विमल थोरात यांनी स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर आधारीत आदर्श समाज निर्माण करण्यासाठी भारतीय संविधानाला केंद्रस्थानी ठेवल्यास स्त्रियांचा विकास निश्चित होणार असे त्यांनी सांगितले. तसेच स्त्रियांच्या आजच्या परिस्थितीवर अनेक दाखले देत उपस्थितांशी संवाद साधला. प्रा. डॉ. शैलेंद्र लेंडे यांनी 21 व्या शतकात लिंगभेदासारखे प्रश्न मोठे होताना दिसतात आणि हे प्रश्न मिटविण्यासाठी स्त्रीविषयक सकारात्मक दृष्टिकोन जोपासने गरजेचे आहे. म. फुले, रामस्वामी पेरियार, बसवेश्वर, डॉ. आंबेडकरांनी सुदधा स्त्रिपुरूष समानतेचा संदेश दिला आहे. मात्र, त्याची अंमलबजावणी समाजात होताना दिसून येत नाही. आजही समाजात जात, लिंग, वंश, धर्म, प्रथा आणि परंपरा यामध्ये समाज गुरफटलेला दिसून येतो. यालाच अनुसरून ते म्हणाले की, समाजाची मानसिकता काळाच्या विसंगत नव्हे तर परस्पर पोषक तसेच परस्पर सुसंगत असणे अतिशय महत्वाचे आहे. अध्यक्षीय भाषणात प्रा. गौतम कांबळे म्हणाले की, विशिष्ट माणसांनी, विशिष्ट माणसांसाठी ही अशी व्यवस्था आहे की, ज्याचे परिणाम म्हणून 21 व्या शतकात समाजाची अतिशय दुर्दैवी परिस्थिती निर्माण झालेली दिसून येते. माणसाच्या मानसिकतेला घडविणा—या धर्मशास्त्राचा वापर आज पितृसत्ता निर्माण करण्यासाठी होत आहे. त्यामुळे या धर्मशास्त्राला समजून घेण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

पहिल्या सत्रात प्रा. वनिता तुमसरे यांनी 'जात व पुरूषसत्ता' यावर विचार व्यक्त केले. डॉ. प्रदीप मेश्राम यांनी 'लिंगभेद आणि जात' यावर विचार व्यक्त केले. दुस—या दिवशी, पहिल्या सत्रात मा. शैलेंद्र लेंडे यांनी 'लिंगभेद, साहित्य व संस्कृती या विषयावर सखोल चिंतन व्यक्त केले तर प्रा. अधरा देशपांडे यांनी 'स्त्रिया व हिंसाचार' या विषयातून स्त्रीयांवरील अत्याचार व कायद्यांची माहिती दिली. याच दिवशी तिस—या सत्रात मा. प्रा. डॉ. विकास जांभूळकर यांनी स्त्री विषयक सिद्धांत व चळवळी यावर सविस्तर माहिती दिली. कार्यशाळेच्या तिस—या दिवशी पहिल्या सत्रात कु. श्रृती उके यांनी 'जेंडर व पुर्नउत्पादन' या विषयाची मांडणी केली. तर दुस—या सत्रात मा. प्रा. कविता मते यांनी, स्त्रीपुरूष समानतेवर आधारित विविध प्रश्नावली व खेळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले. सदर कार्यशाळे करिता मातृसेवा संघ महाविद्यालय, नागपूर विद्यापीठातील राज्यशास्त्र विषयाचे विद्यार्थी सहभागी झाले होते. तसेच विविध सा. संघटनेच्या महिला प्रतिनिधींनी यामध्ये सहभाग नोंदविला. कार्यशाळेचा समारोप मा. डॉ. विकास जांभूळकर, मा. डॉ. शैलेंद्र लेंडे व मा. डॉ. मोहन वानखेडे यांच्या उपस्थित पार पडला. या कार्यशाळेसाठी प्राचार्य रवि पाटील यांचे सहकार्य मिळाले. कार्यशाळेच्या यशस्वितेकरिता प्रा. विद्या चौरपगार, प्रा. कविता मते, प्रा. प्रगती हरले, प्रा. सुनंदा भैसारे, प्रा. अनिता तिरपुडे, प्रा. रोहिणी मेश्राम, मिस. शबीना शेख, प्रा. अर्चना मेश्राम, प्रा. अश्विनी, प्रा. गौतम कांबळे, प्रा. अविनाश फुलझेले, प्रा. मोहन वानखडे, प्रा. पुष्पांजली यांनी परिश्रम घेतले. या कार्यशाळेकरिता महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक बहुसंख्येने हजर होते.


DR.AMBEDKAR COLLEGE
DEEKSHA BHOOMI,
NAGPUR.


DR.AMBEDKAR COLLEGE
DEEKSHA BHOOMI,
NAGPUR.


Latitude: 21.129239
Longitude: 79.067466
Elevation: 314.87m
Accuracy: 8.5m
Time: 26-12-2019 11:17
Note: Workshop Gender Studies &
Sensitization


Latitude: 21.129243
Longitude: 79.067554
Elevation: 302.87m
Accuracy: 6.5m
Time: 26-12-2019 11:18
Note: Workshop Gender Studies &
Sensitization